# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१७ – १८

### **भूगोल विभाग**

जनशक्ति
7/12

## राजगुरू महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची अमूल डेअरीला अभ्यास भेट

। **राजगुरुनगर** प्रतिनिधी।

**हुतात्मा** राजगुरू महाविद्यालयातील भूगोल विभागातील ३४ विद्यार्थ्यांनी चांडोली येथील अमूल डेअरीला भेट देऊन दुग्ध प्रक्रिया उद्योगाची माहिती घेतली. डेअरीचे मानव संसाधन व्यवस्थापक अमित रच्चावार यांनी दूध व्यवसायासंदर्भात माहिती देताना गायींविषयी सविस्तर माहिती दिली. गुजरातमध्ये १९४६ रोजी सुरू झालेला अमूल दूध चळवळीचा इतिहास व उत्पादने यांची माहिती दिली. तसेच दररोज सुमारे २ लाख लीटरहून अधिक दूध संकलन होत असल्याचे सांगून ९० पेक्षा अधिक स्थानिक महिलांना रोजगार मिळवून दिल्याचे त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांनीही यापासून प्रेरणा घेत शास्त्रीय पद्धतीने दुग्ध व्यवसाय करण्याचे ठरविले. या कृषिपूरक भेटीचे आयोजन प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली भूगोल विभाग प्रमुख प्रा. दिलीप मुळूक, प्रा. डी. एम. मास्कड, प्रा. मच्छिंद्र मुळूक यांनी केले.



# विद्यार्थ्यांनी घेतली दुग्ध प्रक्रिया उद्योगाची माहिती

राजगुरुनगर : प्रतिनिधी

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील भूगोल विभागातील सुमारे ३४ विद्यार्थ्यांनी चांडोली येथील अमूल डेअरीला भेट देऊन दुग्ध प्रक्रिया उद्योगाची माहिती घेतली. डेअरीचे मानव संसाधन व्यवस्थापक अमित रत्नाकर यांनी विद्यार्थ्यांना दुग्ध व्यवसायाच्या संदर्भात सविस्तर माहिती दिली.

कृषी-भूगोल अभ्यासक्रमाच्या अंतर्गत शेतीपूरक व्यवसायांचा विद्यार्थी अभ्यास करीत असतात. हा अभ्यास करणारे बहुतांश विद्यार्थी ग्रामीण भागातील शेतकरी कुटुंबातील आहेत. पशुपालन आणि दुग्धव्यवसाय हा त्यांच्या जीवनाचा अविभाज्य भाग आहे. दुग्ध व्यवसायात वैज्ञानिक दृष्टिकोन ठेवून शास्त्रशुद्ध पध्दतीने केल्यास चांगल्या प्रकारची आर्थिक समृध्दी येऊ शकते, या उद्देशाने या भेटीचे आयोजन केले होते.

सहकारातील सर्व नियमांचे पालन करून दुग्ध व्यवसायात अमूल डेअरीने स्वत:ची यशोगाथा अधोरेखित केली आहे.

चांडोली येथील अमोल डेअरी प्रकल्पाचे मानव संसाधन व्यवस्थापक अमित रत्नाकर यांनी दुग्ध व्यवसायाच्या संदर्भात माहिती देताना गायींचे प्रकार, त्यांना होणारे आजार, गायी संगोपनाचे तंत्र, त्यांचा आहार, दुधाचे संकलन, दूध व्यवसायात महिलांची भूमिका, अमूल डेअरीच्या वतीने गायींची पैदास आणि औषधोपचारा संदर्भात विकसित करण्यात आलेली प्रणाली यासंदर्भात विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती दिली. गुजरातमध्ये १९४६ रोजी सुरू झालेल्या अमूल दूध चळवळीचा क्रांतिकारक इतिहास विद्यार्थ्यांना सांगितला. आज अमूल डेअरीच्या माध्यमातून ६० पेक्षा अधिक दुग्धजन्य पदार्थांचे उत्पादन होत असल्याचे सांगून दर्जा, गुणवत्ता व स्वच्छता या बाबतीत विशेष काळजी घेण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. चांडोली येथील केंद्रात दुधापासून पाश्चराईज्ड दूध, दही, ताक हे तीन पदार्थ बनविले जात असून दररोज सुमारे २ लाख लीटरहून अधिक संकलन होत असल्याचे सांगून ९० पेक्षा अधिक स्थानिक महिलांना रोजगार मिळवून दिल्याचे त्यांनी सांगितले. डेअरीची यशोगाथा व्हिडिओच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना दाखविण्यात आली. विद्यार्थ्यांनीही यापासून प्रेरणा घेत शास्त्रीय पध्दतीने दुग्धव्यवसाय करण्याचे ठरविले. या कृषिपूरक भेटीचे आयोजन प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली भूगोल विभागप्रमुख प्रा. दिलीप मुळूक, प्रा. डी. एम. माशाळ, प्रा. सचिन मुळूक यांनी केले.



दुग्ध प्रक्रिया उद्योगाची माहिती घेताना विद्यार्थी.

केसरी पुणे, २५ डिसेंबर २०१७ ३

# राजगुरू महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची अमूल डेअरीला भेट

राजगुरुनगर, (वार्ताहर) : येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या भूगोल विभागातील सुमारे ३४ विद्यार्थ्यांनी चांडोली (राजगुरुनगर, ता. खेड) येथील अमूल डेअरीला भेट देऊन दुग्ध प्रक्रिया उद्योगाची माहिती घेतली. डेअरीचे मानव संसाधन व्यवस्थापक अमित रथावार यांनी विद्यार्थ्यांना दुग्ध व्यवसायाच्या संदर्भात सविस्तर माहिती दिली.

चांडोली येथील अमोल डेअरी प्रकल्पाचे मानव संसाधन व्यवस्थापक अमित रथावार यांनी दुग्ध व्यवसायाच्या संदर्भात माहिती देताना गायींचे प्रकार, त्यांना होणारे आजार, गायी संगोपनाचे तंत्र, त्यांचा आहार, दुधाचे संकलन, दुग्ध व्यवसायात महिलांची भूमिका, अमूल डेअरीच्या वतीने गायींची पैदास आणि औषधोपचारासंदर्भात विकसित करण्यात आलेली प्रणाली या संदर्भात विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती दिली.

तसेच गुजरातमधील अमूल डेअरीच्या माध्यमातून ६० पेक्षा अधिक दुग्धजन्य पदार्थांचे उत्पादन होत असल्याचे सांगून दर्जा, गुणवत्ता व स्वच्छता याबाबतीत विशेष काळजी घेण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. याशिवाय चांडोली येथील केंद्रात दुधापासून पाश्चराईज्ड दूध, दही, ताक हे तीन पदार्थ बनविले जात आहेत. दररोज सुमारे २ लाख लीटरहून अधिक संकलन होत असल्याचे सांगून १० पेक्षा अधिक स्थानिक महिलांना रोजगार मिळवून दिल्याचे त्यांनी सांगितले. या भेटीचे आयोजन प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली भूगोल विभाग प्रमुख प्रा. दिलीप मुळूक, प्रा. डी. एम. मारकड, प्रा. मच्छिंद्र मुळूक यांनी केले.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख